ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : संस्कृत सुबोध श्लोक सटीक

प्रकाशक : बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, बॉम्बे

प्रकाशन वर्ष : १८७५

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

# संस्कृत सुबोध श्लोक

सटीक.

# SANSKRIT VERSES,

WITH TRANSLATION

INTO

**MARATHI AND ENGLISH.**

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.

THIRD EDITION.

मुंबईमध्यें एड्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

सन १८७५.

*Price* 1½ *Annas.* किम्मत दीड आणा.

1875.

# संस्कृत सुबोध श्लोक

## सटीक.

# SANSKRIT VERSES,

WITH TRANSLATION

INTO

**MARATHI AND ENGLISH.**

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.

THIRD EDITION.

मुंबईमध्यें एड्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

सन १८७५.

*Price 1½ Annas.* किम्मत दीड आणा.

1875.

The reader is requested to observe that the spelling of the Sanskrit is that which is customary among Maráthá Bráhmans. J. M. M.

3rd Edition.—3,000 Copies.

## १ । शिष्य उवाच ।

असंख्यातानि तीर्थानि पुण्यक्षेत्राणि चैव हि
येषां कीर्त्या चिरात् कालात् सर्वा व्याप्तास्ति मेदिनी १
रामेश्वरो हरिद्वारं काशी द्वारावती गया
नासिकं त्र्यंबकादीनि तेषां माहात्म्यमुत्तमं २

---

१ । **शिष्य ह्मणाला**; असंख्यात तीर्थें आणि पुण्यक्षेत्रें आहेत त्यांच्या कीर्त्तीनें पुष्कळ काळापासून पृथ्वी व्याप्त झाली आहे;

रामेश्वर, हरिद्वार, काशी, द्वारका, गया, नासिक, आणि त्र्यंबक इत्यादि तीर्थांचें माहात्म्य उत्तम आहे.

---

I. *Scholar.*—There are innumerable Tírthas and sacred places, with the fame of which from of old the world is filled;—

Rámeshwar, Haridwár, Káshí, Dwáraká, Gayá, Násik, Trayambak, and so on; the glory of these is very great: —

तथापि सर्वतीर्थेषु ब्रूहि श्रेष्ठतमं गुरो
अहं तच्छरणं गत्वा नाशयिष्यामि पातकं ३

गुरुरुवाच

हे शिष्य सर्वतीर्थानामेकमेव महत्तमं
यत् कुर्यात् हृदयं शुद्धं तत् पुण्यक्षेत्रमुत्तमं ४

---

तरी हे गुरो या सर्व तीर्थांमध्यें अत्यंत श्रेष्ठ तीर्थ कोणतें हें मला सांगावें; तेथें मी शरण जाऊन सर्व पातकांचा नाश करीन.

**गुरु ह्मणाला,** हे शिष्या, सर्व तीर्थांमध्यें एकच तीर्थ अत्यंत श्रेष्ठ आहे. जें हृदयातें शुद्ध करितें तें उत्तम पुण्यक्षेत्र होय.

---

But declare to me, O Teacher, the most excellent of all the Tírthas: for thither shall I go for refuge and destroy my sin.

*Teacher.*—O Scholar, of all the Tírthas one truly is the greatest: that which will make the heart clean is the most excellent of sacred places.

प्राप्नोति य इदं तीर्थं निष्फलस्तस्य न श्रमः
अप्राप्तस्येदृशं तीर्थं श्रमो भवति निष्फलः ५
भूस्थानि सर्वतीर्थानि यदि नामांकितान्यपि
मनःशुद्धं न कुर्वंति तीर्थमन्यद्गवेषय ६

जो हें तीर्थ पावतो त्याचा श्रम निष्फल होत नाहीं, परंतु असें तीर्थ न पावणाऱ्या मनुष्याचा श्रम व्यर्थ आहे.

पृथ्वींतील पुष्कळ तीर्थें जरी नामांकित आहेत तरी तीं मन शुद्ध करीत नाहींत ह्मणून तूं अन्य तीर्थाचा शोध कर.

---

Who finds this Tírtha, his labour is not fruitless; but fruitless is the labour of him who finds it not.

Not all the Tírthas in the world, although highly renowned, can purify the heart: seek therefore a different Tírtha.

## २. शिष्य उवाच

कथं भवेन्नरो भ्रष्टो भक्ष्यं वाभक्ष्यमस्ति किं
किं शुद्धं किमशुद्धं वा भो गुरो तत् प्रकाशय १

## गुरुरुवाच

मुखं यत् प्रविशेत् शिष्य भ्रष्टं तन्न करिष्यति
मुखात् तु यद् बहि र्याति तद् भ्रष्टं कर्तुमर्हति २

---

२. **शिष्य ह्मणाला**, हे गुरो, मनुष्य कशानें भ्रष्ट होतो, भक्ष्य किंवा अभक्ष्य काय आहे, शुद्ध अथवा अशुद्ध काय, तें मला सांगावें.

**गुरु ह्मणाला**, हे शिष्या, जें मुखांत जातें तें भ्रष्ट करीत नाहीं, परंतु जें मुखांतून बाहेर येतें तें मनुष्यास भ्रष्ट करितें.

---

II. *Scholar.*—How does a man become polluted? what may, and what may not, be eaten? what is pure, and what impure? O Teacher, this to me explain.

*Teacher.*—The thing that goes into the mouth will not render a person polluted. But that which comes out of the mouth, that is capable of polluting.

शिष्य उवाच

गुरो इदं त्वया प्रोक्तं वाक्यमाश्चर्यकारकं
ततो मन्मानसे जातं संशयं छेत्तुमर्हसि ३

गुरुरुवाच

मुखं यत् प्रविशेत् शिष्य तत् शरीरे न तिष्ठति
प्राप्यैव पक्वतां तत्र पूर्णे काले विनश्यति ४

---

**शिष्य ह्मणाला,** हे गुरो, आपण हें वाक्य आश्चर्यकारक बोललां ह्मणून माझ्या मनांत उत्पन्न झालेला संशय दूर करण्यास आपण योग्य आहां.

**गुरु म्हणाला,** हे शिष्या, जें मुखांत जातें तें शरीरांत राहत नाहीं; पण तेथें पक्वपणा पावून काल पूर्ण झाला असतां नष्ट होतें.

---

*Scholar.*—O Teacher, the words which you have spoken cause astonishment; and you need to remove the perplexity which they have awakened in my mind.

*Teacher.*—That which goes into the mouth, O Scholar, does not continue in the body; but, after being digested there, it perishes.

मुखात् हि निःसरंत्येव शापा हे शिष्य कुत्सिताः
असंख्यातापशब्दाश्च जगत्कल्याणनाशिनः ८
कुर्वंत्येते नरं भ्रष्टं अशुद्धं जायते मनः
ततो मनोगतं पापं विनाशयति मानवं ९

---

परंतु जगाचें अकल्याण करणारे असे शाप व असंख्यात अपशब्द हे मुखांतून निघतात.

हे मनुष्याला भ्रष्ट करितात, यांकडून मन अशुद्ध होतें; नंतर तें मनोगत पाप मनुष्याचा नाश करितें.

---

But out of the mouth, O Scholar, there issue foul curses, and innumerable wicked words, destructive of the happiness of the world.

It is these that make a man polluted; his heart becomes impure, so that sin pervading the heart quite destroys the man.

तस्मान्मा खादितुं भैषीर्भक्षयस्व यथेप्सितं
बिभीहि दुर्वचो वक्तुं शुद्धं सत्यं सदा वद ७
पातकं मानसे जातं तस्य शुद्धिः कथं भवेत्
तत् पश्चात् कथयिष्यामि गंभीरं विद्यते मतं ८

---

ह्मणून तूं खावयास भिऊं नको; यथेच्छ खात जा, तरी वाईट बोलावयास भी; सर्वकाळ शुद्ध व खरें बोल.

आतां मानसोत्पन्न पापाची शुद्धि कशी होईल हें मी पुढें सांगेन; तें मत फार गंभीर आहे.

---

Therefore fear not about food,—eat whatever you think fit: but fear to utter evil words,—speak ever the pure and the true.

As for the sin produced in the mind, how it shall be cleansed away, this I shall afterwards declare,—the subject is deeply important.

## ३. शिष्य उवाच

मतानि भिन्नभिन्नानि व्याप्तानि वसुधातले
किं सत्यं किमसत्यं वा ज्ञातुमिच्छामि भो गुरो १
नरा ये भारते संति ते प्रायो मूर्त्तिपूजका:
न मूर्त्तिपूजका: केचित् देशांतरनिवासिन: २

---

**३. शिष्य ह्मणाला,** हे गुरो, या पृथ्वीवर पुष्कळ मतें भिन्न भिन्न आहेत. त्यांत सत्य कोणतें व असत्य कोणतें हें जाणायास इच्छितों.

या भरतखंडांतील लोक बहुतकरून मूर्तिपूजक आहेत, अन्य देशांत मूर्तिपूजक नाहींत असे लोक आहेत.

---

III. *Scholar.*—Conflicting opinions are diffused throughout the world. What is true, and what untrue? This, O Teacher, I desire to know.

Those who dwell in India are for the most part idolaters; some residing in other countries are not idolaters.

तथा भिन्नेषु देशेषु भिन्नाभिन्नास्तु रीतयः
भिन्नार्चनप्रकाराश्च प्रचलंति समंततः ३
ईदृशी महती जाता सर्वतो मतभिन्नता
तन्मूलं कथ्यतां मह्यं भवद्भिरनुकंपया ४

---

तशाच देशोदेशीं रीति भिन्न आहेत व पूजेचे प्रकार बहुत ठिकाणीं भिन्नभिन्न चालतात.

या प्रमाणें ठिकाणोंठिकाणीं अशीं भिन्न मतें कां झालीं हें आपण कृपा करून सांगावें.

---

So too in different countries there are different rites; and differing forms of worship prevail in many places.

This vast diversity of sentiment that has been produced among men, let the reason of it be explained to me through your condescension.

## गुरुरुवाच

पक्षपातं विना शिष्य श्रोष्यसि वचनं मम
तदा दास्यामि दृष्टांतान् कांश्चित् संदेहनाशिनः ८
इंद्रियागोचरो देवो ऽस्तीति स्वीक्रियते जनैः
भक्तिस्त्वदृश्यदेवस्य स्वतः कर्तुं न शक्यते ९

---

**गुरु ह्मणाला,** हे शिष्या, तूं पक्षपात सोडून जर माझें वचन ऐकशील, तर संशय दूर करणारे असे कांहीं दृष्टांत सांगेन.

देव चक्षुरादि इंद्रियांस दृश्य नाहीं या गोष्टीस सर्व कबूल आहेत आणि अदृश्य देवाची भक्ति स्वतः करितां येत नाहीं.

---

*Teacher.*—Without partiality, O Scholar, if you will listen to my words, I will give you explanations that will remove your doubt.

God is imperceptible to the senses—this is by men confessed. But God the invisible cannot by us be adored,—

इति मत्वा विरचंति चित्राणि स्वर्गवासिनां
मूर्त्तीनां पादयोश्चैव पतंत्यज्ञानमोहिताः ७
अन्ये च विस्मिता दीप्त्या ज्योतिषां व्योमचारिणां
देवान् तान्येव मन्यंते सत्यं त्यक्त्वा परेश्वरं ८

---

असें मानून मनुष्यें स्वर्गवासी लोकांचीं चित्रें रचितात, आणि अज्ञानमोहित होऊन त्यांच्या पायां पडतात.

कोणी लोक आकाशांतील नक्षत्रांच्या कांतीनें मोह पावून सत्य जो परमेश्वर त्यास टाकून त्या नक्षत्रांसच देव मानितात.

---

So believing, they execute pictures of the inhabitants of heaven, and fall at the feet of these images in the delusion of their ignorance.

Others, greatly struck by the splendour of the stars that travel through the sky, regard them as deities, having rejected the True, the Supreme.

भ्रांतानेतान् समान् दृष्ट्वा नरास्त्वन्ये मनीषिणः
इंद्रियागोचरं देवं भजंति दृढभावतः ९
पितु गृहात् गतः पुत्रः कुरुते स्मरणं पितुः
इंद्रियागोचरो भूतोऽपि न विस्मर्यते पिता १०

---

हे सर्व एकसारखेच भ्रांत आहेत असें मानून विद्वान लोक इंद्रियागोचर देवाला दृढ भक्तीने भजतात.

बापाच्या घरापासून जर पुत्र कोठें गेला तर तो बापाचें स्मरण करितो ; बाप इंद्रियागोचर झाला ह्मणून त्यास विसरतो असें नाहीं.

---

But others, wise men, perceiving all of these to be deceived, worship with steadfast devotion the invisible God.

The son, when he has left his father's house, still remembers his father. Though removed from his sense, his father is not forgotten.

स्वर्गीयं तर्हि विस्मृत्य पितरं सत्तमं कुतः
पाषाणस्यापि कुर्वंति पूजामज्ञानमज्जिताः ११
देवस्य दर्शनं भिन्नं भिन्नं पाषणदर्शनं
एको भजनपात्रो यस्तं भजस्व परेश्वरं १२

---

तर मग अत्यंत श्रेष्ठ असा जो स्वर्गांतील बाप त्यास विसरून अज्ञानी होऊन पाषाणाची भक्ति कां करावी ?

देवाचें दर्शन वेगळें आणि पाषाणाचें दर्शन वेगळें आहे. आतां भजनास योग्य जो एक ईश्वर त्याला भज.

---

How, then, forgetting the best of fathers, even the heavenly one, do men, plunged in ignorance, pay adoration even to a stone?

To look on a stone is very different from looking upon God. The one who is worthy to be adored, adore Him, even the Supreme.

## ४. शिष्य उवाच

आस्ते ऽत्र भारते विद्वन् विविधा वर्णभिन्नता
परिश्रुताश्चतुर्वर्णा ब्राह्मणक्षत्रियादयः १
अन्ये च बहुला भेदा गदितुं तान् न शक्यते
द्युज्योतिषां यथा संख्या तथा तेषामजायत २

---

४. **शिष्य ह्मणाला,** हे गुरो, या भरतखंडांत अनेक वर्ण आहेत. यांत ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र हे चार वर्ण मख्यात आहेत.

आणखींहि पुष्कळ भेद आहेत ते मला सांगतां येत नाहींत ते तर आकाशांतील ताऱ्यांसारखे असंख्यात झाले आहेत.

---

IV. *Scholar.*— O learned man, here in India there is a great diversity of castes : chiefly celebrated are the four, Bráhman, Kshatriya, and the rest.

And there are many other distinctions, which it is impossible to mention, for they have become as numerous as the lights of heaven.

बहुवर्णाः कुतो जाता जिज्ञासा जायते मम
हृदि मे संशयं जातं छेत्तुमर्हसि भो गुरो ३

गुरुरुवाच

वर्णान् उद्दिश्य हे शिष्य परिपृष्टं त्वया यतः
अतिप्राचीनशास्त्राणां मतं वक्ष्यामि ते मुदा ४

---

असे हे अनेक वर्ण कां झाले तेंहि जाणावें अशी माझी इच्छा आहे. हे गुरो, आपण माझ्या हृदयांतील हा संशय दूर करावा.

**गुरु ह्मणाला**, वर्ण जाणावे या बुद्धीनें हे शिष्या, त्वां मला पुसलें ह्मणून फार प्राचीन शास्त्रांतील मत मी आनंदानें सांगतों.

---

I have a desire to know whence these many castes have arisen. The doubt that has sprung up in my mind, you must, O Teacher, remove.

*Teacher.*—Regarding the castes, O Scholar, since you have made inquiry, I will tell you the opinion of the most ancient Shastras.

आदौ स्त्रीपुरुषावेकौ सृष्टवान् परमेश्वरः
सर्वेंच मानवास्ताभ्यां समुत्पन्ना महीतले ८
नृजातेः पितरावेतौ नासन्नन्ये पितामहाः
तस्मात् हि भ्रातरः संति भूमिष्ठाः सकला जनाः ९

---

प्रथम ईश्वरानें दोन माणसें उत्पन्न केलीं ह्मणजे एक स्त्री व एक पुरुष, मग त्यां दोघांपासून पृथ्वीवरील सर्व मनुष्यें उत्पन्न झालीं.

त्या स्त्रीपुरुषांशिवाय मनुष्य जातीला दुसरें मूळ नव्हतें ह्मणून पृथ्वीवरील सर्व लोक परस्पर भाऊ आहेत.

---

In the beginning God created one man and one woman; and from these two have all human beings on earth descended.

These two are the parents of human kind,—there was no other origin of man, and therefore the men that dwell on the face of the earth are all brothers.

भाषाणां जायते भूमौ बह्वीनामुद्भवो यथा
वर्णभेदास्तथा शिष्य संभवंति पदे पदे ७
उत्तमस्तस्य वर्णोऽस्ति यः प्रेम्णा भजतीश्वरं
(पापी यो नीचवर्णः स मनुष्यो ब्राह्मणोऽपि सन् ८

---

जशा या पृथ्वीवर अनेक भाषा उत्पन्न झाल्या त्याप्रमाणें प्रतिपदीं वर्णभेद होत आहेत.

परंतु जो कोणी प्रेमानें ईश्वराचें भजन करितो त्याचा वर्ण उत्तम जाणावा. जर पातकी आहे तर त्याचा वर्ण नीच, तो ब्राह्मण जरी असला तरी.

---

As on the earth many languages arise, so do distinctions of caste, O Scholar, gradually arise.

He is of the best caste who lovingly worships God. The wicked man is of low caste, even if he were a Bráhman.

हे शिष्य बहुचांडाला भक्त्या प्राप्स्यंति तारणं
अभक्त्या बहवो विप्रा दुःखं प्राप्स्यंति नारकं ९

५. शिष्य उवाच

पृथिव्यां हे गुरो देवा असंख्याताः श्रुता मया
महादेवो गणेशश्च रामकृष्णांबिकादयः १

---

हे शिष्य, पुष्कळ चांडाळ भक्ती करून तारण पावतील. आणि पुष्कळ ब्राह्मण अभक्ती करून नरकदुःख भोगतील.

**५. शिष्य बोलला**, हे गुरो, मी पृथ्वीमध्यें महादेव, गणपति, राम, कृष्ण, अंबिका इत्यादि असंख्य देव ऐकतों.

---

Through devotion, O Scholar, shall many Chandalas attain salvation; and through the want of it shall many Bráhmans meet the pains of hell.

V. *Scholar.*—O Teacher, I have heard of deities innumerable in the world,—such as Mahádeva, Ganesha, Rama, Krishna, Ambiká (Deví), and others.

शरणं कं तु गच्छेयं आश्रयः को भवेन्मम
आस्ते महान् दयालुः कः को मद्धिताय कल्पते २
असंख्यातानि पापानि क्रियंते सर्वदा मया
ततोऽत्यंतं मनः खिन्नं क्लेशाविष्टं भयाकुलं ३

---

परंतु त्यांमध्यें मी कोणाला शरण जाऊं ? मला आश्रय होऊन माझें साह्य करील असा मोठा दयाशील कोण देव आहे ?

मी सर्वदां असंख्य पापें करीत आलों यामुळें माझें मन अत्यंत खिन्न होऊन भ्यालें आहे.

---

To whom shall I betake myself for aid? who will be my refuge? who is greatly gracious? who is equal to my help?

For sins without number are by me continually committed; and therefore is my heart exceedingly sad, crushed with grief, and alarmed.

गतस्य बहुतीर्थानि न गतं मम पातकं
ततो जातो निराशोऽहं पापशोधनसाधने ४

गुरुरुवाच

हे शिष्य बहुलान् देवान् भक्त्या त्वं शरणंगत:
स श्रमो निष्फल: सर्वो बहुकालं कृतोऽपि ते ५

---

मी पुष्कळ तीर्थ हिंडलों तरी माझें पाप गेलें नाहीं ह्मणून मी पाप दूर होण्यासाठीं निराश झालों.

**गुरु ह्मणाला**, हे शिष्या, तूं पुष्कळ श्रम करून बहुत देवांकडे भक्तिपूर्वक शरण गेलास पण हे तुझे श्रम व्यर्थ आहेत.

---

Many Tírthas have I visited, but my sin has not departed: and therefore I am in despair as to the cleansing away of my guilt.

*Teacher.*—O Scholar, many deities have you devoutly gone to supplicate; but all that labour of yours is bootless, although continued for a lon g time.

जानीहि भगवानेकः स्वयंभू र्लोकपालकः
इंद्रियागोचरोऽ नादिरप्रमेयः परेश्वरः ६
ये केचिदाश्रयंत्येनं व्यर्थकामा न ते कदा
निराशा न भविष्यंति परं सिद्धमनोरथाः ७

---

आतां सांगतों ऐक. भगवान् एक आहे तो अनादि, स्वयंभू, लोकरक्षक, चक्षुरादि बाह्येंद्रियांस अदृश्य, परिणामशून्य असा आहे.

जे कोणी त्याचा आश्रय करितात ते व्यर्थकाम किंवा निराश होत नाहींत, परंतु पूर्णमनोरथ होतील.

---

Know that Bhagawán is one—the self-existent—the preserver of men—imperceptible to the senses—without beginning—inconceivable—the Lord Supreme.

Whosoever seek Him as a refuge shall never be disappointed, nor abandoned to despair, but the desires of their hearts shall be fulfilled.

प्राचीनैः पंडितैरुक्तं श्लोकमेकमिमं शृणु
श्रुत्वाचासत्यदेवानां मा कार्षी भंजनं पुनः ८
अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम
तस्मात् कारुण्यभावेन रक्ष रक्ष परेश्वर ९

---

प्राचीन पंडितांनीं केलेला हा एक श्लोक ऐकून खोट्या देवाचें भजन फिरून कधीं करूं नको.

तुजवांचून दुसरा कोणी माझें रक्षण करण्यास समर्थ नाहीं ह्मणून हे परमेश्वर, तूं कृपा करून माझें रक्षण कर.

---

Hear this one shloka uttered by the wise of old: and having heard it, never again give worship to false gods.

"Other refuge have I none,—Thou truly art my refuge; do Thou, therefore, in thy graciousness, preserve, preserve me, O Lord Supreme!"

अपराधसहस्राणि क्रियंते निश्चितं त्वया
तथापि तारकं स्मृत्वा प्रार्थयस्व परेश्वरं १०
कस्तारकः कथं जातः कर्म्म तेन च किं कृतं
पश्चात् ते तद् गदिष्यामि सावधानमनाः शृणु ११

---

तूं खचित हजारों पापें करितोस तथापि तारकाला स्मरून परमेश्वराची प्रार्थना कर.

आतां तारणारा कोण, तो कसा झाला, त्यानें काय कर्म केलें हें मी पुढें सांगेन, तूं स्वस्थमनानें श्रवण कर.

---

Certainly thousands of sins are committed by you: yet, remembering the Saviour, pray to the Supreme.

Who is the Saviour—how He came—and what work was by Him accomplished,—this I will afterwards declare—listen with attentive mind.

## ६. शिष्य उवाच.

सत्कथामवताराणामभिकांक्षामि वेदितुं
तां गुह्यां हे गुरो मह्यं कृपया संप्रकाशय १
कुतः स्वर्गसुखं त्यक्त्वा ऽवतीर्णो ऽ भूत् परेश्वरः
पापभ्रष्टै र्जनैः साकं पापास्पृष्टो ऽ वसत् कथं २

---

६. **शिष्य ह्मणाला**, अवतारांची उत्तम कथा जी गुह्य आहे ती जाणावी अशी माझी इच्छा आहे, ह्मणून हे गुरो, कृपा करून ती सांगावी.

परमेश्वरानें आकाशाचें सुख सोडून एथें अवतार कां घेतला? तो निष्पाप असतां पापी लोकांत कसा राहिला?

---

VI. *Scholar.*—The true account of the Incarnations I desire to know. This deep matter, O Teacher, unfold to me in kindness.

How, forsaking the bliss of heaven, did the Deity descend? How did He, Who was untouched by sin, dwell with sin-polluted men?

अत्यंतो महिमा यस्य कुतो देहं दधार सः
अद्भुतेयं गुरो वार्त्ता सप्रमाणा न भाति मे ३

गुरुरुवाच

हे शिष्य कथयिष्यामि तां वार्त्तां हृष्टमानसः
गुह्यामप्यवतीर्णस्य देवस्य वसुधातले ४

---

ज्या देवाचा महिमा अत्यंत त्यानें नरदेह कां धरिला ? हे गुरो, ही अद्भुत गोष्ट मला खरी वाटत नाहीं.

गुरु ह्मणाला, या भूमंडळीं अवतीर्ण जो परमेश्वर त्याची कथा अत्यंत गुप्त आहे तरी मी तुला ती आनंदानें सांगतों.

---

He, Whose greatness is infinite, how did He assume a body ? Amazing, O Teacher, is this matter, and it appears to me incapable of proof.

*Teacher.*—O Scholar, with a joyful heart shall I declare to you this matter, though profound, of the Deity coming down to earth.

मज्जंति हि जनाः सर्वे भीमे ऽस्मिन् पापसागरे
तर्तुं नैव च शक्नोति स्वशक्त्या कोऽपि मानवः ८
तथाप्यतिकृपालुः सन् सर्वतः परमेश्वरः
शुभं कांक्षति सर्वेषां स्वपुत्राणां पिता यथा ९

---

सर्व मनुष्यें भयंकर पापसमुद्रांत बुडालीं आहेत, त्यांतील कोणी एकही आपल्या शक्तीनें तरावयास योग्य नाहीं.

तथापि सर्व लोकांवर कृपाळू असा जो परमेश्वर, जसा बाप आपल्या मुलांचें कल्याण इच्छितो तसें सर्व लोकाचें कल्याण इच्छितो.

---

All men are plunged in the awful ocean of sin; and no man can work his deliverance by his own power.

But He the Supreme, Who ever is all-gracious, desires the happiness of all, as a father does that of his children.

तस्मात् त्राणाय लोकानां स्वर्गादवरुरोह सः
नरदेहं ययौ धर्तुं कृपयैव प्रवर्तितः ७
जगन्मित्रं जगत्त्राता जगत्कल्याणकारकः
जगतो रक्षणार्थायावततार परेश्वरः ८

---

ह्मणून लोकांच्या रक्षणासाठीं भगवान् स्वर्गापासून आला आणि त्यानें कृपेंकरून मनुष्यदेह धारण केला.

जगाचा मित्र, जगाचा तारक, जगाचा कल्याणकर्ता जो परमेश्वर तो जगाच्या रक्षाणासाठीं पृथ्वीवर अवतरला.

---

Therefore for the salvation of men did He descend from heaven; He came, impelled by pity, to assume a human form.

The world's friend—the world's Saviour—the world's benefactor—He, the Supreme, came down, for the world's deliverance.

एक एवावतारो ऽ भूत् नृदेही भूमिमंडले
यत् तारणस्य कर्मासीत् तत् तेन सफलं कृतं ८

### ७. पुनः गुरुरुवाच.

आदावीशात्मजो ह्यासीत् हे शिष्य ज्ञातुमर्हसि
आसीत् स सार्द्धमीशेन स्वयमीश्वर एव च १

---

या भूमंडळीं मनुष्यजातीमध्यें एकच अवतार झाला. जें तारणाचें काम करायाचें होतें तें सर्व त्यानें तेव्हांच समाप्तीस नेलें.

**७. पुनः गुरु बोलला,** प्रारंभीं ईश्वराचा पुत्र होता, हे शिष्य, तूं जाणावयास योग्य आहेस, तो स्वतः ईश्वर असतां ईश्वराबरोबर होता.

---

Only one incarnation has taken place in the world—even that in human form; and the work of salvation was by Him to the full accomplished.

VII. *Teacher.*—In the beginning was the Son of God,—this, O Scholar, it befits you to know. He was with God, and was also God Himself.

नृजातेरुद्भवः कोऽपि कदा नापश्यदीश्वरं
क्रोडेस्थितो ऽ द्वितीयः स देवं प्राकाशयत् सुतः २
नृजातौ हि दयां चक्रे परमां परमेश्वरः
स्वकीयमद्वयं पुत्रं प्राददद् भूमिमंडले ३

---

कोणीहि मनुष्यानें ईश्वरास पाहिलें नाहीं, देवाच्या उराशीं राहिलेला जो एकुलता एक पुत्र त्यानें देव प्रगट केला आहे

ईश्वरानें मनुष्यांवर थोर दया केली आहे, त्यानें आपला एकुलता एक पुत्र पृथ्वीमध्यें पाठवून दिला.

---

No mere man hath seen God at any time. He Who is in the bosom of the Father, the only Son of God, hath revealed God.

God hath loved the race of man with a vast love, and hath sent into the world His only Son.

न तु दंडयितुं लोकान् प्रैषीत् तं परमेश्वरः
नरजातिं परित्रातुं सूनुं प्रेषितवान् विभुः ४
स दयालुस्तदा स्वर्गात् प्रादुर्भूयेश्वरात्मजः
अवतीर्णो नृरूपेण चकारोद्धारणं महत् ५

---

तो लोकांला दंड करण्यासाठीं दिला नाहीं, परंतु लोकांच्या तारणासाठीं खचित आपला पुत्र प्रभूनें पाठविला.

तो दयाळु ईश्वराचा पुत्र स्वर्गापासून प्रगट होऊन मनुष्यावतार धरून मोठा तारणोपाय करिता झाला.

---

Not to condemn the world did God send Him; God sent His Son to save the human race.

He, the compassionate Son of God, was revealed from heaven, and coming in a human form, He achieved a great salvation.

लोकानां प्रतिभूर्भूत्वा स दिव्यस्तारको ऽभवत्
मरणार्हमनुष्यार्थं दंडं सेहे न चात्मने ६
मृत्वापि मृतलोकानां मध्ये नातिष्ठदद्भुतः
मृत्योश्च बंधनान्मुक्तः प्राप्तवान् पुनरुत्थितिं ७

---

लोकांचा जामीन होऊन हा दिव्य तारणारा झाला. त्यानें आपल्यासाठीं नाहीं, पण मरणार्ह मनुष्यासाठीं शिक्षा सोसली;

तो मेला असतांहि मेलेल्या लोकांमध्यें राहिला नाहीं, तो मृत्यु-बंधनापासून सुटून पुनः उठला.

---

Being made the substitute of men, He became a Divine Redeemer; and the punishment of death-deserving men He bore, not His own.

Having died, He, the Wonderful, did not continue among the dead; but, loosed from the bands of death, He attained to resurrection.

आरुरोह पुनः स्वर्गं भूत्वा चातिप्रतापवान्
जगत्त्राता क्षमादाना विश्वराडस्ति सर्वदा ८
नररूपं धृतं तेन तत्त्यागो न भवेत् पुनः
ईशमानवरूपेण चिरं कालं स तिष्ठति ९

---

तो पुनः आकाशांत चढला आणि अत्यंत प्रतापी होऊन जगाचा रक्षक, क्षमा देणारा, विश्वाचा राजा असा सर्वकाळ आहे.

तो एकदां धरलेला मनुष्यपणा कधीं सोडणार नाहीं, तो ईश्वर व मनुष्य या उभयरूपानें सर्वकाळ राहतो.

---

He ascended again to heaven, and being invested with surpassing glory, He ever is the Redeemer of the World—the Dispenser of Pardon—the King of the Universe.

The human form which He hath once assumed• He will never again lay aside—eternally He remaineth in the form of God and of man.

आगतो ऽसौ पुनः स्वर्गान् भूमिस्थै र्दृक्ष्यते जनैः
आहूय निकटं सर्वान् योग्यं न्यायं करिष्यति १०
अविश्वस्याधुना ये ये तुच्छं कुर्वंति तारकं
ते ते दुःखं गमिष्यंति नरकस्य निरंतरं ११

---

तो पुनः स्वर्गापासून आला असतां सर्व लोक त्याला पाहतील, तो सर्व लोकांस जवळ बोलावून त्यांचा न्याय करील.

जे जे लोक त्याजवर विश्वास न ठेवून तारणाऱ्याला तुच्छ करितात ते ते सर्वकाळच्या नरकदुःखांत जातील.

---

He, coming again from heaven, will be seen by all human beings; and having summoned them to His presence, He will perform righteous judgment.

They who now, through unbelief, despise the Redeemer, shall pass to the everlasting punishment of hell.

ये केचनाश्रयंत्येनं धन्यास्ते निश्चितं सदा
भग्नाशा न भविष्यंति परं प्राप्स्यंति तारणं १८

### ८. शिष्य उवाच

कीर्त्तिमान् स चमत्कर्त्ता जगतस्तारको महान्
स कस्तस्याभिधा कास्ते स कुत्र न्यवसद् भुवि १

---

जे कोणी याचा आश्रय करतील ते लोक खचित धन्य आहेत, ते निराश होणार नाहींत, ते उत्तम तारण पावतील.

८. **शिष्य ह्मणाला**, तो अद्भुत चमत्कार कर्ता व जगाचा मोठा तारणारा तो कोण? त्याचें नांव काय? तो पृथ्वीवर कोठें राहिला?

---

But they who seek refuge in Him, blessed verily are they for ever: their hope shall not deceive them,—they shall attain supreme salvation.

VIII. *Scholar.*—This great Saviour of the world, illustrious, wonderful—who is He? what is His name? where was His dwelling upon earth?

## गुरुरुवाच.

श्रीयेशूख्रीस्तनामास्ते प्रसिद्धं भूमिमंडले
जन्म देशे खनानाख्ये बभूव सुखदायकं २
अर्थोऽस्ति तारको येशू शब्दस्य ज्ञातुमर्हसि
ख्रीस्तस्यचाभिषिक्तोऽस्ति नामैतत् प्राप्तमीश्वरात् ३

---

गुरु ह्मणाला, त्याचें नाम येशूख्रीस्त, हें नाम भूमंडळीं प्रसिद्ध आहे. त्याचा जन्म खनान देशांत झाला, तें सुखदायक आहे.

येशू या शब्दाचा अर्थ तारणारा हें तूं जाणावयास योग्य आहेस. ख्रीस्त याचा अर्थ अभिषिक्त. हें नाम ईश्वरानें दिलें.

---

*Teacher.*—His name—renowned in the world—is Jesus Christ. His Joy-communicating birth took place in the country of Canaan.

Know that the meaning of the word *Jesus* is *Saviour*—and that of *Christ* is *Anointed*; and that the appellation came from God.

विश्वस्य बहवस्तस्मिन् देशांतरनिवासिनः
भक्त्याच शरणं गत्वा प्राप्नुवन्नुत्तमं सुखं ४
भारतस्था जनाः प्रायस्तुच्छं कुर्वंति तं कुतः
नान्यस्त्राता विना तेन जगत्कल्याणकारकः ५

---

देशोदेशचे लोक त्याजवर विश्वास ठेवून त्याला शरण जाऊन मोठें सुख पावते झाले आहेत.

पण बहुतकरून भरतखंडांतील लोक त्याला तुच्छ कां मानितात? त्यावांचून जगाचा कल्याणकर्ता व तारणारा दुसरा कोणी नाहीं.

---

Many of the inhabitants of other countries having believed in Him, and with devotion seeking refuge in Him, have attained to great blessedness.

Why do the people of India generally despise Him? Save Him there exists no Saviour, bliss-giving to the world.

तत्साहाय्येन हे शिष्य तर्तुमर्हसि केवलं
तं शीघ्रं शरणं याहि तस्मिन् विश्वासभावतः ९

---

हे शिष्या, तूं केवळ त्याच्या साह्यानें तरायास योग्य आहेस, ह्मणून तूं त्याला शरण जा आणि मनापासून त्यावर विश्वास ठेव.

---

Only by His help, O Scholar, can you be saved. Haste then to Him for refuge, and with the heart believe on Him.